| MHDH070010462026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३९३/२०२६ |
|---|---|
| | दिलीप देवराम पाटील वगैरे<br>वि.<br>कोणीही नाही.<br>प्रविण दिलीप पाटील (मयत) |

## निशाणी क्र.१ वरील आदेश
## ( घोषित दिनांकः ०३ जुलै, २०२६)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) अर्जदारांचे थोडक्यात असे कथन की, मयत प्रविण दिलीप पाटील हे अर्जदार क्र.१ यांचा मुलगा व अर्जदार क्र.२ चा भाऊ होता. प्रविण दिलीप पाटील याचे दिनांक २२.०३.२०२५ रोजी मौजे जोलवा, ता. पलसाना, जि. सुरत येथे निधन झाले. तसेच मयताची आई नामे सुनंदा दिलीप पाटील ह्या दिनांक ०६.१२.२०२५ रोजी मयत झाल्या. मयत प्रविण दिलीप पाटील हे मौजे विखरण, ता. शिरपूर, जि.धुळे येथील रहिवासी होते. मयत प्रविण दिलीप पाटील यांचे मृत्यू पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी ते मयत प्रविण दिलीप पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत, असे ठरवून मिळण्यासाठी सदरचा अर्ज केलेला आहे. अर्जदार यांना शासकीय व निमशासकिय तसेच खाजगी कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब, अर्जदारांनी ते मयत प्रविण दिलीप पाटील यांचे कायदेशीर वारस घोषित होऊन वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

३) प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर सूचना व जाहीर प्रगटन दिल्याप्रमाणे दैनिक "आपला महाराष्ट्र" या वृत्तपत्राच्या दिनांक ०५.०५.२०२६ रोजीच्या अंकात प्रकाशित करण्यात आले व या अर्जाबद्दल संबंधितांना जर काही आक्षेप असेल तर त्यांनी याबाबत न्यायालयास लेखी कळविण्याविषयी सूचित करण्यात आले. परंतु अद्यापपावेतो असा कोणताही आक्षेप या न्यायालयास प्राप्त झालेला नाही.

४) पुढील प्रश्न माझ्या विचारार्थ येतात, त्यावर मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवितो.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय? | **होय.** |
| २. | आदेश काय? | **अर्ज मंजूर केला.** |

**– कारणमिमांसा –**

**प्रश्न क्र. १ करिता** –

५) अर्ज व त्यातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदार क्र.२ आकाश दिलीप पाटील यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.१०) सादर केले. तसेच प्रविण दिलीप पाटील यांच्या मृत्यू दाखल्याची पडताळीत प्रत (नि.क्र.१२), सुनंदा दिलीप पाटील यांच्या मृत्यू दाखल्याची पडताळीत प्रत (नि.क्र.१९), अर्जदारांच्या व मयताच्या आधारकार्डाच्या पडताळीत प्रती अनुक्रमे (नि.क्र.१३ ते १५), जाहीर नोटीस (नि.क्र.११), जाहिरनामा (नि. क्र.७) व पुरावा बंद पुरसीस (नि.क्र.१६) इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. ज्या मजकुराचा अर्जात उल्लेख आहे तोच मजकूर अर्जदाराने शपथपत्रात पुन्हा कथन केलेला आहे.

६) अर्जदारांतर्फे देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकास पुरक असून तो अबाधित आहे तसेच अर्जदारांनी हा जो अर्ज दाखल केला आहे. त्याबाबत जाहीर प्रगटन (नि.क्र.११) दिल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. मयत प्रविण दिलीप पाटील यांचे मृत्यु प्रमाणपत्र हे नि.क्र.१२ वर दाखल आहे. त्यावरुन ते दिनांक २२.०३.२०२५ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर आलेले आहे. तसेच त्यांनी अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत प्रविण दिलीप पाटील यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नसलेबाबत कथन केलेले आहे. हिंदु वारसा कायदा–१९५६ वर्ग–१ मधील परिशिष्ठानुसार हिंदु पुरुषाच्या मृत्युनंतर त्याची आई, पत्नी, मुले व मुली आणि मुलांची अपत्ये हे वर्ग–१ चे वारस आहेत. परंतु प्रस्तुत प्रकरणात मयत हा मृत्यूपूर्वी अविवाहीत होता. अशा परिस्थितीत मयताची आई हीच सदर कायद्यानुसार वर्ग–१ म्हणून वारस

असते. परंतु मयताची आई सुनंदा दिलीप पाटील ही देखील मयत आहे. अशा परिस्थितीत सदर कायद्यानुसार वर्ग–१ चे वारस अस्तित्वात नसतांना मयताचे वारस त्याचे वडील, भाऊ व बहीण यांना वर्ग–२ म्हणून वारस घोषित करता येते. त्यामुळे, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार हे मयत प्रविण दिलीप पाटील यांचे हिंदु वारसा कायदा–१९५६ च्या परिशिष्ठानुसार वर्ग–२ चे वारस आहेत असा निष्कर्ष काढण्यात येत आहे.

७) बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये मयताच्या वारसास त्यांचा मयताच्याबाबतचा औपचारीक हक्क न्यायालयाकडून मान्य करुन घ्यावयाचा असल्यास ते बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये अर्ज करु शकतील. तसेच, उद्घोषणेच्या कालावधीनंतर आणि कुठलेही आक्षेप आलेले नसल्यानंतर न्यायालय मयताच्या वारसाबाबतचा पुरेसा पुरावा अभिलेखावर घेवुन ॲपेंडीक्स–बी अन्वये मयताच्या वारसांना ते मयताचे औपचारीक वारस असल्याचे प्रमाणपत्र तात्काळ देतील.

८) वर नमुद केलेल्या कायदेशीर तरतुदीप्रमाणे अर्जदार यांनी ते मयताचे कायदेशिर वारस असल्याचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणलेला आहे. त्याप्रमाणे ते मयत प्रविण दिलीप पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचे मत मी नोंदविलेले आहे. तसेच, अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्राची विविध शासकीय, निमशासकिय तसेच इतर कामासाठी आवश्यकता आहे. वर नमुद केलेल्या जाहीर प्रकटनानंतर कोणीही हरकत नोंदवली नसल्याने अर्जदार यांच्या लाभात बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये मयताचे औपचारीक वारस प्रमाणपत्र हे वर नमुद कामासाठी वारस म्हणून अर्जदार यांचे नांव लागणेसाठी देणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

<u>**प्रश्न क्र. २ करिता**</u> –

९) अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र हे अर्जदार यांचे नावे मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदविलेला असल्याने

बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम ३ अन्वये ॲपेंडीक्स–ब प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**१०)** भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३९० अन्वये बॉम्बे रेग्युलेशन अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास भारतीय कायदा कलम ३९० लागू असून त्या अन्वये कोर्ट फी ॲक्ट अन्वये योग्य तो मुद्रांक लावणे आवश्यक असल्याबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे बॉम्बे रेग्युलेशन अन्वये देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास देखील महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट लागू असल्याने अर्जदारांनी महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्टचे परिशिष्ट क्र.१ चे आर्टीकल १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्टीकल १० व ११ अन्वये न्यायालयीन मुद्रांक भरणे आवश्यक व जरुरीचे आहे. परिणामतः हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी प्रश्न क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार क्र.**१) दिलीप देवराम पाटील** व **२) आकाश दिलीप पाटील** हे मयत **प्रविण दिलीप पाटील** यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येत आहे.

३. अर्जदार यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन तरतुदींचे ॲपेंडीक्स 'ब' प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अर्जदार यांनी योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क न्यायालयात जमा करावे.

५. बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद नंबर ३१२ अन्वये वारस दाखल्यामध्ये तशी टिप ठेवण्यांत यावी.

PAWAN RAMBHAU DHORE
Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2026.07.03 17:36:05 +0530

दिनांकः– ०३.०७.२०२६.
स्थळः– शिरपूर.

**( पवन रा. ढोरे )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शिरपूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– एम. एम. मोरे

न्यायालयाचे नांव :– सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिरपूर, जि. धुळे.

पी.डी.एफ.संचिका अपलोड केल्याचा दिनांक :– ०३.०७.२०२६

**सही/–**

लघुलेखक श्रेणी – ३